लिडकॉम

सत्यमेव जयते

लिडकॉम

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

## प्रेस नोट

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची स्थापना १ मे, १९७४ रोजी कंपनी अधिनियम १९५६ अन्वये अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील चांभार, ढोर, होलार व मोची यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामजिक विकासासाठी स्थापन झाले आहे. महाराष्ट्रातील चर्मोद्योगाचा विकास करणे, प्रोत्साहन व चालना देणे, चर्मोद्योग व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान विकसीत करणे हे महामंडळाचे मुख्य उदिष्टे आहेत. महामंडळाच्या मा. संचालक मंडळाच्या दि.११.१०.२०२४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय खालीलप्रमाणे -

१. महामंडळाच्या विविध कर्ज योजनांच्या रक्कम रु. ५० हजार पासून रु.५.०० लाख पर्यंतच्या कर्जास दोन जमीनदार ऐवजी एक सक्षम नोकरदार जमीनदार घेण्यात येईल.

२. प्रत्येक कर्जाचे सिबिल स्कोर असणे बंधनकारक असेल.

३. अर्जदाराचे व्यवसाय करण्याकरिता ग्रामपंचायत/नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र याची अट शिथिल करून लाभार्थ्याच्या व्यवसायाचे शॉप ॲक्ट/उद्योग आधार प्रमाणपत्र असावे.

४. महाराष्ट्र राज्यातील चर्मकार समुदायाच्या विकासासाठी लिडकार, बंगलोर येथील सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करुन मोबाईल व्हॅनद्वारे मोबाईल शोरुम/विक्री सुविधा उघडून स्वयंरोजगारास चालना देण्याकरीता बेरोजगार युवकांकरिता सदरची योजना तालुका पातळीवर रक्कम रु.४ लाख,जिल्हा पातळीवर रु.६ लाख ,नगरपालिका पातळीवर रु.८ लाख व महानगरपालिका हद्दीत रु.१० लाख इतक्या रक्कमेच्या असून लाभार्थी सहभाग ५०% व महामंडळाचा सहभाग ५०% इतका असेल.उपरोक्त सर्व योजना बँकेमार्फत राबविण्यात येतील.

५. Self Help Group मॉडेलद्वारे स्वयंरोजगारासाठी महिलांकरिता प्रशिक्षण देऊन खेळते भागभांडवल व साधन सामग्रीकरिता नियमानुसार अर्थसहाय्य महामंडळामार्फत पुरविण्यात येईल. तसेच सदर योजना महिला बचत गट अंतर्गत राबविण्यात येईल.

६. कारागिरांना प्रोत्साहन करण्याकरिता सूक्ष्म उपक्रम आणि विपणन सहाय्य योजना राबविण्यात येईल व प्रशिक्षण खर्च महामंडळामार्फत करण्यात येईल.

उपरोक्त तीनही योजना राबविण्याकरिता मा.संचालक मंडळामार्फत रक्कम रु.५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

७. कोल्हापुरी चप्पलचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्याकरिता कुशल कारागिरांची नेमणूक करण्यास मान्यता दिली.

८. महामंडळामार्फत चर्मवस्तू व पादत्राण आणि लेदर आर्टिकल्समध्ये डिझाइन स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून स्पर्धेच्या आयोजनाकरिता व स्पर्धेनंतर बक्षिसाचे प्रयोजन करण्यात आले.

९. महामंडळाच्या चर्मवस्तू व पादत्राणांचे विशेषतः कोल्हापूरी चप्पलचा प्रचार, प्रसार, एक्सपोर्ट व विक्री वाढविण्याचे दृष्टीने केंद्रशासनाच्या महामंडळामार्फत ई-कॉमर्ससह ओपन नेटवर्क फॉर डिजिटल (ONDC) यांचेशी सलग्न करण्यात येईल.

१०. महामंडळाच्या उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी व विक्रीत वाढ करण्यासाठी उत्पादन युनिट आणि विक्री केंद्र मजबूत करण्यासाठी तांत्रिक आणि व्यवस्थापन व्यावसायिक नियुक्त करण्यात येत आहे. यामुळे, उत्पादनाचा दर्जा सुधारण्यात मदत होऊन विक्रीत वाढ होणार आहे.

सही/-
(प्रेरणा देशभ्रतार, भा. प्र. से)
व्यवस्थापकीय संचालक